



श्री बाबांची अपूर्व योगसाधना

ुवारी ]

किं. ६० पैसे

[ १९८०

# अनुक्रमणिका – फेब्रुवारी १९८०


१) संपादकीय
२) श्रीमंत अनुबाई वहिनीसाहेब घोरपडे — सदानंद चेंदवणकर
३) श्री. एन. के. पारेख यांचा सत्कार-समारंभ
४) प. पू. श्रीगोदावरी माताजी
५) श्री. अ. ब. चितांबर
६) श्री. म. पां. भावे
७) श्रीस्वामी संजयानंद
८) डॉ. सुमती खानविलकर
९) डॉ. इंदू नाईक
१०) डॉ. मालती राहाटे
११) सौ. लता ह. पाटील
१२) प्रा. र. श्री. पुजारी
१३) श्री. शिवाजी कौ. मोरे
१४) ॲड. के. टी. एच. भुरानी
१५) अमन
१६) श्री. डी. बी. जगतपुरीया
१७) रमाकांत पंडित
१८) ॲड. श्री. कोलनपाका राव
१९) श्री. रमेश चव्हाण
२०) श्री. गं. दे. कुलकर्णी
२१) श्री. विजय हजारे
२२) सौ. लुसी गुप्ते
२३) श्री. शाम बुवळे
२४) श्री. जगदीश देवपूरकर
२५) सौ. लीला मराठे
२६) श्री. सूर्यकांत दळवी
२७) सौ. चंद्राबेन भाटे
२८) सौ. शारदा वाकनीस
२९) सौ. सरला गर्जे
३०) श्री. उज्ज्वल बी. कुलकर्णी
३१) सौ. कलावती चव्हाण
३२) श्री. राधाकृष्ण गुप्ता [ चेतन ]
३३) सौ. उषा अधिकारी
३४) श्री. रघुनाथ सांडभोर
३५) श्री. श्रीराम आठवले
३६) श्री. ना ग. परुळेकर
३७) श्री. हरीभाऊ बोबडे
३८) श्री. नृसिंहराजा देशपांडे
३९) सौ. उमा जंगम
४०) श्री. नागेश मोंगलाईकर
४१) श्री. मधुकर वखारे
४२) सौ. शांताबाई सरोदे
४३) लीलाताई गोलतकर
४४) प्रा. गुंडेराव पटवारी
४५) लीलावती गुजराथी
४६) सौ. अस्मिता दांडेकर
४७) कु. शशिकला साळगांवकर
४८) डॉ. विनायक दुर्गे
४९) श्री. प्र. अ. पुराणिक
५०) श्री. दत्तात्रय मोरे
५१) सौ. मीना खाडीलकर
५२) सौ. प्रतिभा तेंडुलकर
५३) श्री. डी. बी. पोतनीस
५४) श्री. विनायक पाठक
५५) शिरडी वृत्त–नव्हेंबर–७९
५६) राधाकृष्णस्वामी–श्रद्धांजली
५७) ग्रंथपरिक्षण

# श्रीसाईकाव्यबहार विशेषांक

जगा लावावे सत्पथी । हेचि साईलीलेची कृती ।।



## श्रीसाई वाक्सुधा

ज्ञान ही वस्तु जाणावयाची ।
नव्हे ती विषय उपदेशाची ।
प्रणिपात परिप्रश्न सेवा हींचि ।
गुरुकृपेचीं साधनें ॥ ६७ ॥

विश्वाचे सत्यत्व महाभ्रम !
हेंचि ज्ञानावरण तम ।
निरसूनि जावें लागे प्रथम ।
प्रज्ञान ब्रम्ह प्रकटे ते ॥ ६८ ॥

संसार बीज जें अज्ञान ।
डोळां पडतां गुरुकृपांजन ।
उडे मायेचें आवरण ।
उरे तें ज्ञान स्वाभाविक ॥ ६९ ॥

ज्ञान हें तों नव्हे साध्य ।
तें तों आधींच स्वयंसिद्ध ।
हें तो आगम निगम प्रसिद्ध ।
अज्ञान हा विरोध ज्ञानाला ॥ ७० ॥

देवां भक्तां जें भिन्नपण ।
हेंच मूळ अज्ञान विलक्षण ।
तया अज्ञानाचें निरसन ।
होतांच पूर्ण ज्ञान उरे ॥ ७१ ॥

—श्रीसाईसच्चरित–अध्याय ३९ वा


# श्रीसाईलीला

[ श्रीसाईबाबांचे संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक ]

वर्ष ५८ वे] फेब्रुवारी १९८० [ अं. ११

: संपादक :

श्री. क. हि. काकरे,

रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :

- डॉ. श्री. दि. परचुरे, (इंग्रजी आवृत्ती)
- श्री. सदानंद चेंदवणकर (मराठी ,, )

वार्षिक वर्गणी रु. ६–०० (ट. ख. सह)

किरकोळ अंक ६० पैसे फक्त.

: कार्यालय :

"साईनिकेतन", प्लॉट नं. ८०४—बी,

डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई १४.

पिन : ४०००१४

दूरध्वनी : ४४ २२ ६१

## संपादकीय –

स. न. वि. वि.

# सहावे लेखक–कवी स्नेह संमेलन

श्रीसाईलीला मासिकाच्या लेखक–कवींचे सहावे स्नेहसंमेलन शिरडी येथे येत्या शनिवार ता. ९ व रविवार १० फेब्रुवारी या दोन दिवशी भरविण्यात येत आहे. महाराष्ट्रात विविध विषयांवरची एवढी भरपूर मासिके आहेत; त्यातून असंख्य लेखक आपापली हजेरी लावतात. परंतु या मासिकांतून हजेरी लावणारी मंडळी कधीकाळी चार घटका एकत्र जमतात असे ऐकीवात नाही. श्रीसाईलीला मासिकाने मात्र गेल्या पाच वर्षापासून म्हणजे १९७५ सालापासून फार सुंदर उपक्रम सुरू केलेला आहे. या मासिकातून हमेशा हजेरी लावणारी मंडळी चार घटका नव्हे चार दिवस वर्षाकाठी एकत्र जमू लागलेली आहेत. एरवी आमच्या येथे साहित्य सेवकाला किंमतच नाही. वेळ खर्चून, प्रसंगी पदरमोड करून त्यांनी लेखन करावे, जीवापलिकडे आपले लेखन जपावे, ते छापले गेले तर त्याला आनंद व्हावा या पलिकडे सामान्य लेखकाची मजल जात नाही.

श्रीसाईलीला मासिकाने अनेक लेखक-कवींना प्रकाशात आणले आहे. लेखक-कवी नसलेल्यानाही चांगले लिहावयास शिकविले आहे. बाबांचे भक्त असलेली ही लेखक मंडळी आहेत तरी कशी ? ती आपली भक्ती, श्रद्धा कसकशी व्यक्त करतात. त्यांच्या बाबांच्या बद्दलच्या भावना तरी किती खोलवर आहेत ? त्यांचे विचार तरी काय आहेत ? श्रीसाईलीलेच्या विकासाच्या दृष्टीने त्यांचा काही आपण उपयोग करून घेऊ शकू काय ? इ. चा विचार करता करता ही मंडळी जर दोन-चार दिवस एकत्र आली तर किती चांगले होईल या विचारसरणीने प्रेरित होऊन संमेलनाची कल्पना आम्हाला प्रथम सुचली. ती तत्कालीन न्यायालयधारक श्री. का. सी. पाठक साहेब यांना आम्ही समजावून दिली. ती त्यांना लागलीच पसंत पडून १९७५ साली ती योजना साकार पण झाली, व पहिले संमेलन छोट्या प्रमाणावर येथे साजरे झाले.

आज या संमेलनाचा व्याप वाढला आहे. श्रीसाईलीलेचाही प्रचार-प्रसार देशात-परदेशात भरपूर होत आहे, ज्या उद्देशाने संमेलन भरवावे असे वाटत होते तो उद्देश सफल होत आहे हे पाहून समाधान वाटते. अर्थात् या सर्व कार्यास श्रीसाईबाबाच आम्हास शुभाशिष देत आहेत हे विसरून चालणार नाही. गेल्या ५ संमेलनाप्रमाणेच यंदाचेही हे संमेलन यशस्वीपणे पार पडो व श्रीसाईलीला भरसूक प्रगती पथावर येवो अशी शुभेच्छा प्रदर्शित करतो.

★

# श्रीमंत अनुबाई वहिनीसाहेब घोरपडे इचलकरंजीकर



—सदानंद चेंदवणकर
कार्यकारी संपादक, श्रीसाईलीला
श्रीसाईबाबा संस्थान, शिरडी

● श्रीसाईलीला मासिकाच्या लेखक कवींचे सहावे स्नेहसंमेलन श्रीसाईबाबांच्या शिरडी या पुण्यक्षेत्री शनिवार ता. ९ व रविवार ता. १० फेब्रुवारी १९८० रोजी मोठ्या उत्साहाने भरविण्यात येत आहे. या संमेलनात श्रीसाईबाबांना पाहिलेल्या, त्यांचे दर्शन घेतलेल्या, त्यांच्या सहवासात वावरलेल्या भाग्यवानांची अध्यक्ष या नात्याने आम्ही आजवर निवड करीत आलो आहोत. यास अनुसरून यंदाच्या वर्षी या संमेलनास सध्या करवीर नगरीत वास्तव्य करीत असलेल्या इचलकरंजी संस्थानच्या भूतपूर्व युवराज्ञी श्रीमंत अनुबाई वहिनीसाहेब घोरपडे यांची अध्यक्षपदी आम्ही निवड करीत आहोत ही आनंदाची गोष्ट आहे. श्रीसाईलीला मासिकाचा ऑगस्ट १९७९ चा अंक श्रीसाईबाबा हयातकालीन व्यक्ती विशेषांक म्हणून आम्ही प्रसिद्ध केला होता व त्यावरून श्रीसाईबाबांचे दर्शन सुख घेतलेल्या अनेक सुसंस्कृत व्यक्ती आज हयात असल्याचे आम्हांस दिसून आले.

संमेलनाध्यक्षा श्रीमंत अनुबाई या मूळच्या पुण्याच्या. त्यांचा जन्म अलिबाग येथे १९ आक्टोबर १९०० रोजी झाला. पूर्वाश्रमीच्या त्या कु. विमलाताई गोविंदराव कानिटकर. त्यांचे वडील श्री. गोविंदराव वासुदेव कानिटकर हे अलिबागेस न्यायाधिश होते. अलिबाग, धुळे, मालेगाव, येवला इ. ठिकाणी त्यांनी न्यायमूर्तीपदे भूषविली. श्री. अनुबाईंच्या मातोश्री श्री काशीताई या एकावेळच्या मराठीतील

चांगल्या लेखिका, वक्त्या व विख्यात कादंबरीकार श्री. हरीभाऊ आपटे यांच्या मानलेल्या भगिनी होत. श्री. अनुबाईंचे आजोबा रा. ब. वासुदेवराव बापूजी कानिटकर हे मुंबई सरकारचे इंजिनियर होऊन गेले.

श्री. अनुबाई वहिनीसाहेब यांचे प्रा. शिक्षण येवले येथे घरीच झाले. पुढे वयाचे नवव्या वर्षी वडील पेन्शन घेऊन पुण्यास आल्यावर पुण्याच्या हुजूरपागा ह्या मुलींच्या शिक्षण संस्थेत त्यांनी प्रवेश केला व १९१५ चे एप्रिल पर्यंत त्या इंग्रजी ५ वी पर्यंत तेथे होत्या १९१४ चे मे महिन्यात त्यांचा श्री. लक्ष्मण विष्णु जोशी एम्. ए यांचेशी विवाह झाला श्री. जोशी हे १९१५ ते १९१७ अलाहाबाद येथे कायस्थ पाठशाळा कॉलेज मध्ये इतिहासाचे प्रोफेसर होते, व त्या २ वर्षांचे अवधीत श्री. अनुबाई वहिनीसाहेब ह्यांनी बनारसच्या थिऑसॉफिकल स्कूल मध्ये राहून मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. श्री. लक्ष्मण विष्णु जोशी यांना त्यांचे सख्खे चुलते जे त्यावेळी इचलकरंजी संस्थानचे घोरपडे घराण्यात दत्तक गेल्याने अधिपती होते, त्यांनी इचलकरंजीस बोलाविले व श्री. जोशी यांना आपले खाजगी चिटणीस केले. श्रीमंत नारायणराव बाबासाहेब घोरपडे व श्रीमंत सौ. गंगाबाई माईसाहेब यांना संतती नसलेने त्यांनी श्री. जोशी ह्यांना दत्तक घेऊन ( १९१९ मध्ये ) आपले गादीला वारस केले व त्यांचे नाव श्रीमंत वेंकटराव रावसाहेब व श्री. सौ. विमलाताईंचे नाव श्री. अनुबाई वहिनीसाहेब असे ठेवले. दत्तकविधाना नंतर संस्थानचा कारभार श्रीमंत युवराज रावसाहेब यांचेवर सोपवून काही महिने श्रीमंत इचलकरंजीकर सरकार इंग्लंडला जाऊन आले. १९२३ पर्यंत श्रीमंत युवराज इचलकरंजी संस्थानचे बरेचसे काम पहात होते परंतु १९२४ चे अखेर त्यांचा अकाली दुःखद अंत झाला व श्रीमंत वहिनीसाहेब यांचेवर दुःखाचा डोंगर ऐन तरुण वयात कोसळला. श्रीमंत बाबासाहेब इचलकरंजीकर यांचा दुर्दैवाने पाठपुरावा केला व पुन्हा संस्थानचा कारभार त्यांना हाती घ्यावा लागला तो त्यांचे २१ ऑक्टोबर १९४३ साली अकल्पित निधन होई पर्यंत ! श्रीमंत रावसाहेब यांचे निधन झाले तेव्हा त्यांच्या दोन कन्या व एक पुत्र अल्पवयी होते व हे एकुलते एक चिरंजीव पुढे गादीचे वारस होतील ह्या आशेने कै. श्रीमंत बाबासाहेब यांनी त्यांचे शिक्षणाची अत्यंत काळजी घेतली. श्री. वहिनी साहेब सुशिक्षित असलेने संस्थानच्या काही खात्याचे अधिकार त्यांना दिले परंतु दुर्दैवाने अजून ही पाठ सोडली नाही व १९२८ चे अखेर सद्‌गुणी, बुद्धीवान, कला प्रेमी अशा एकुलत्या एक पुत्रासही हिराहून नेऊन राजकुटुंबाला दुःखाचे खाईत लोटले ! ! श्री. वहिनीसाहेब यांना जीवन असह्य झाले परंतु पितृतुल्य श्वशुरांचे आधारावर आपल्या दोन कन्यांचे शिक्षण व संगोपन करीत व होईल ती समाजसेवा

करीत इचलकरंजी येथे १९४४ पर्यंत त्या राहिल्या! श्रीमंत सरकार बाबासाहेब यांनी आपल्या दोन्ही नातींना मॅट्रिकपर्यंत शिकवून त्यांचे योग्य वेळी उत्तम वरांशी विवाह करून दिले, सुदैवाने त्यांना पुत्रप्राप्ती झालेलीही पाहिली. २१ ऑक्टोबर १९४३ ला ते अकस्मात् परलोकवासी झाले व १९४४ पासून श्रीमंत वहिनीसाहेब यांनी इचलकरंजी सोडली व त्या कोल्हापूरास स्थायीक झाल्या. त्या १९२८ पासूनच थिऑसॉफिकल सोसायटीच्या मेम्बर असून कोल्हापूरास आल्या नंतर तेथील श्रीकृष्ण थिऑसॉफिकल लॉजच्या अध्यक्ष आहेत. त्यांनी भारताचा बराच प्रवास केला असून काही लेखनही केले आहे. साहित्य, अध्यात्म, संगीत, चित्रकला, भरतकाम इ. ची त्यांना आवड आहे. त्यांच्या ज्येष्ठ कन्या सौ. शैलजादेवी या विशाळगड संस्थानचे राजे श्रीमंत त्रिंबकराव आप्पासाहेब प्रतिनिधी यांच्या पत्नी आहेत व कनिष्ठ कन्या श्री. सौ. निर्मलादेवी ह्या डॉ. श्रीधर वासुदेव सोहोनी एम. ए. आय. सी. एस माजी लोकआयुक्त बिहार राज्य यांच्या पत्नी आहेत.

श्रीमंत वहिनीसाहेब यांचे वय आज ८० वर्षांचे आहे. त्यांनी वयाच्या सातव्या, आठव्या वर्षी श्रीबाबांना पाहिले व तेव्हापासून त्यांची बाबांवर दृढ भक्ती व श्रद्धा आहे. त्या स्वतः रोज बाबांची भक्तीभावाने पूजा अर्चा करतात. श्रीबाबांचे आजवर अनेक अनुभव त्यांना आले आहेत. अगदी अलीकडचा त्यांना आलेला बाबांचा अनुभव त्यांच्याच शब्दात वाचा—

'गुरुवार तारीख १९ जुलै १९७९ आषाढ वद्य एकादशीला नहाणी घरात संध्याकाळी ५ वाजता घेरी येऊन मी पडले व कपाळाला खोक पडून बरेच रक्त गेले. उजवा हात भिंती जवळून जाणाऱ्या नळीवर आपटून दुखावला. मनगटाचे हाडाला दुखापत झाल्याने हात सुजला. कपाळाचे जखमेला सात टाके पडले. ज्या डॉक्टरनी कपाळाची जखम शिवली त्यांना त्यावेळी हाताचे दुखणे तितकेसे जास्ती वाटले नाही. पण हात दुखायचा थांबेना व सूज उतरेना, म्हणून पुन्हा दोनदा डॉक्टरना दाखविला तरीही काही त्यांना विशेष वाटेना! ७ ऑगस्ट १९७९ रोजी जेव्हा पुन्हा डॉक्टरना विचारणेस गेले तेव्हां त्यांनी 'एक्सरे घ्या' असा सल्ला दिला म्हणून लगेच फोटो घेतला व त्यात उजवे हाताचे मनगटाचे हाडाला चीर गेली आहे असे दिसून आले व त्यासाठी मनगटाला प्लॅस्टरिंग करावे लागेल असे डॉक्टरांचे मत पडले! दुसरेच दिवशी प्लॅस्टरचे बँडेज करणेसाठी तिसऱ्या डॉक्टरांचेकडे जायचे होते! दिवसभर मी श्रीसाईबाबांना मनात प्रार्थना करीत होते की प्लॅस्टरींग करावे लागू नये कारण उजव्या हाताला प्लॅस्टरचे बँडेज केलेवर १५ दिवस पूजा वगैरे काहीच करिता येणार नाही. श्रावण मास सुरू आहे पूजा अंतरू नये अशी इच्छा

आहे! दिवसभर मन अस्वस्थ होते. अखेर संध्याकाळी स्नान पूजा आटोपून फोटो घेऊन तिसऱ्या स्पेशालिस्टांचे दवाखान्यात गेले. डॉक्टरनी दुखावलेला हात तपासला व हाताचे २ ही फोटो पाहिले व सांगितले की प्लॅस्टरिंगची जरूरी नाही. पण मी बँडेज बांधतो व पोटात घेणेसाठी औषध सांगतो ते घ्या म्हणजे झाले!! कामापुरते बँडेज सोडा पण पुन्हा लगेच बांधा! लगेच बँडेज व औषध विकत आणवून घेऊन त्यांनी हाताला बँडेज कसे बांधायचे ते दाखवून दिले! केव्हढे समाधान वाटले की उजवा हात १५ दिवस निकामी होत नाही! १५।२० दिवस औषध घेतल्यावर हाताचे दुखणे बरेच कमी झाले व एक महिन्यानंतर बँडेज सुटले! ही श्रीसाईबाबांची कृपा असे, मला निश्चित वाटते.'

☆ ☆ ☆



जो जो मज भजे जैशा जैशा भावे
तैसा तैसा पावे मीहि त्यासी,

संत श्रीसाईबाबा....

भारतातील व भारता बाहेरील असंख्य श्रीसाई भक्तांसाठी श्रीसाईबाबा संस्थान शिरडी रेडीओ सीलोनवर कार्यक्रम प्रसारीत करीत आहे.

१५ मिनीटांचा हा कार्यक्रम येत्या १२ फेब्रूवारी १९८० पासून प्रत्येक मंगळवारी रात्रौ ८-४५ ते ९-०० रेडीओ सीलोनवर ऐका.

सर्व साई भक्तांनी या सुवर्ण संधीचा अवश्य लाभ घ्यावा.

—श्री. क. हि. काकरे
कोर्ट रिसीव्हर,
श्रीसाईबाबा संस्थान, शिरडी.

# मा. श्री. एन्. के. पारेखसाहेब, न्यायमूर्ती, उच्च न्यायालय मुंबई यांचा संस्थानतर्फे सत्कार

श्रीसाईबाबा संस्थान शिर्डीचा कारभार सन १९६० पासून मा. सिटी सिव्हील कोर्ट, मुंबई यांचे मार्फत चालू असून सन १९६८ पासून मा. श्री. एन्. के. पारेख साहेब, जज्ज, सिटी सिव्हील कोर्ट, मुंबई यांचे मार्गदर्शनाखाली कोर्ट रिसीव्हर काम पहात होते.

मा. श्री. पारेख साहेब हे श्रीसाईबाबांचे निस्सीम भक्त असल्याने संस्थानच्य सर्वांगीण विकासासाठी त्यांनी सर्वतोपरी प्रयत्न केले. श्रीसाईबाबांचे समाधी मंदिराचे भोवतालचा भाग, द्वारकामाई, चावडी यांचे नूतनीकरण, अंतर्गत सिमेंट रस्ते, भक्तांच्या वास्तव्यासाठी लाखो रुपयांच्या किंमतीच्या भव्य वास्तू, कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थान इमारती, लेंडीबागेची सुधारणा, नवीन आकर्षक श्री दत्त मंदीर, अशा प्रकारे विविध सुधारणा व नवीन बांधकामे त्यांनी कोर्ट रिसीव्हर मार्फत करवून घेतली. यामागे श्रीसाईबाबांच्या दर्शनास दूरवरून येणाऱ्या साईभक्तांना येथे आल्या-नंतर मनःशांती मिळावी व त्यांचे इच्छेप्रमाणे दर्शन पूजा इ. चा लाभ घेता यावा हाच उदात्त हेतू होता. त्यांच्या कारकिर्दीत ४० लाखाचे नवीन भोजनालयासह निवासस्थान इमारत व २५ लाखाचे भव्य हॉल असलेली इमारतीचे बांधकाम सुरू झालेले आहे.

संस्थानचे बागेत हरीण, मोर, ससे इ. आणवून दर्शनास येणाऱ्या बालकांच्या करमणूकीतही त्यांनी भर घातली आहे.

संस्थानच्या आजच्या भक्तांचे सुखसोईने युक्त असलेल्या स्वरूपाचे व भर भराटीचे श्रेय त्यानांच आहे असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

मा. श्री. एन्. के. पारेखसाहेब यांची नुकतीच मुंबई उच्च न्यायालयात न्याय-मूर्ती म्हणुन नेमणूक झालेने दि. २५–१२–७९ रोजी शिर्डी येथे सत्कार समारंभ आयोजित केला होता. या खास आयोजित केलेल्या समारंभात संस्थानचे वतीने

त्यांना श्री. क. हि. काकरे, कोर्ट रिसीव्हर यांचे हस्ते श्रीफळ व शाल देऊन त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. या प्रसंगी संस्थानचे आर्किटेक्टस् श्री. तलगिरी व श्री. आठल्ये हेही उपस्थित होते, व त्यांचे तर्फेही सत्कार करण्यांत आला.

त्यावेळीं संस्थान कर्मचाऱ्यांच्या वतीने मा. श्री. पारेखसाहेब यांना श्रीलक्ष्मीची मूर्ती श्री. वि. श्री. आपटे, मुख्य लेखाधिकारी,, मुंबई यांचे हस्ते देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

सौ. पारेख यांचाही याप्रसंगी यथोचित सत्कार कु. रेखा दिघे, वरिष्ठ लेखापाल यांचे हस्ते करण्यात आला व उभयतांना दीर्घायुरारोग्य चिंतण्यात आले.

याप्रसंगी कोर्ट रिसीव्हर श्री. क. हि. काकरे, संस्थानचे आर्किटेक्टस् श्री. आर. पी. तलगिरी व श्री. आठल्ये यांची गौरवपर भाषणे झाली. कर्मचाऱ्यांच्या वतीने श्री. डी. सी. पाटील, इंजिनीअर, डॉ. प्र. श्री. देशपांडे, निवासी वैद्यकीय अधिकारी, यांची गौरवपर भाषणे झाली. त्यांनी श्री. पारेखसाहेब व सौ. पारेख बाईसाहेब यांनी संस्थान कर्मचाऱ्यांना मुलाप्रमाणे प्रेमळ वागविल्याबद्दल कृतज्ञतापूर्वक उल्लेख केला.

मा. श्री. पारेखसाहेब यांनी सत्कारास उत्तर देताना संस्थानचे भरभराटीचे श्रेय आपणास नसून प्रत्यक्ष काम करणारे व्यक्तींनाच असल्याचे सांगून संस्थानचे कोर्ट रिसीव्हर व कर्मचारी यांचे कामाचा व सेवाभावी वृत्तीचा गौरव केला आणि सर्वांनी यापुढेही श्रीसाईभक्तांची मनोभावे सेवा अशीच करीत रहाण्याबद्दल संदेश दिला.

श्री. द. चिं. पाठक, शासकीय अधीक्षक यांनी आभार मानले.

कार्यक्रम फारच सुन्दर झाला.

# श्री. पारेखसाहेबांच्या सत्कार समारंभाची काही दृष्यें



कोर्टरिसिव्हर श्री. क. हि. काकरे श्री. पारेखसाहेबांना पुष्पहार घालत असताना



प्रमुख लेखाधिकारी श्री. विनायकराव आपटे
श्री. पारेखसाहेबांना श्रीलक्ष्मीची मूर्ती देऊन हार घालीत असताना



श्री. अवधूतराव शिंदे
श्री. पारेखसाहेबांना
श्री साईबाबांची सुंदर मूर्ती
भेट देत असताना



वरिष्ठ लेखपाल कु. रेखा दिवे
सौ. पारेखसाहेबांना शाल व
श्रीफळ देऊन सत्कार करीत
असताना



# श्रीसाईनाथ देवा!

श्रीसाईनाथ देवा। नित्य घडो सेवा।
मनी नाम जपवा, आशिष द्यावा॥
शुद्ध भाव द्यावा। सत्संग घडावा।
अंतरी अखंडानंद वसावा॥
ज्ञानबोध द्यावा। देह अहंकार जावा।
तेणे होय भेटी। जीवा शिवा॥
अबला नम्र। करी धांवा।
साई उपासनी सदा नमावा॥

—परमपूज्य **श्रीगोदावरी माताजी,**
कन्याकुमारीस्थान, साकुरी



# सद्गुरुराया, तुझे वर्णन काय व कसे करू ?

—श्री. अनंत जयदेव चितांबर
तांबे ब्लॉक्स,
मु. पो. अहमदनगर

काय करू, कसे करू मी, तुझे स्तवन सद्‌गुरुराया। न चले ममबुद्धि, जोवरी तुझी मजवरी न दया ॥ जरी करीन वर्णन तुझे, तव बाह्यस्वरूपावरी। तरी निश्चित होईल ती, शुद्ध फसवेगिरी ॥ मर्म न कळे मज तुझ्या कृतीचे। सार न गमे मज तुझ्या प्रवृत्तिचे ॥ दिससी फकीर, परि लाविसी कपाळी गंध। राहसी मशिदीत, परि बाधा न ठेविसी निर्बंध ॥ न कळे तू कुणाचा, कोण, कोठिला ?। जनसमुदाय हा तर्कातचि भ्रमला ॥ कोणी म्हणती मुसलमान हा, कोणी म्हणती हा हिंदु। स्वमते तुज जात चिकटविती, न जाणता तू प्रतापसिंधु ॥ अग्निधुनि धडाडे प्रज्वलित, तुजजवळी सर्वकाळ। भक्तांस्तव तू निर्मिसी उदीभस्म, पराभवावया काळ ॥ ऐश्वर्ययोग तुझा न कळे कोणा, मूढ आम्ही जाहलो। दाविसी लीला, परि म्हणतो चमत्कार, अज्ञान पंकी रुतलो ॥ नास्तिक हे तुज नमो लागती, जेविं येई अनुभवा। आर्त अर्थार्थी भजों लागती, सांडोनि आगीच्या गर्वा ॥ नवल नवल किती वर्णन करू मी, तुझ्या करूणतेचे। येई हरघडी प्रत्यय अखिल जना, तुझ्या प्रेमसरितेचे ॥ काय सोस तुज, भिक्षा मागण्या भाकर कांद्याची। समर्थ तू भक्तांच्या पुरविसी कामना ऐहिकवैभवांची। न स्वदेहीं प्रेम तुझे, विदेही तू हरिसी भक्तांचे तनुरोग। समर्थ तू लाविसी सत्पंथी त्यांना, दुर्दम्य हा भवरोग ॥ येई अनुभवा सर्वव्यापी तू तुज कळे मनोगत सर्वांचे। विश्वेश्वर तू सर्व लोक महेश्वर तू, करिसी गर्वहरण धर्मांधांचे ॥ पाहिले म्या डोळा द्वारकामाईंत, तू व्याघ्रपशुहि उद्धरिला। काय असे नवल तू मानवा उद्धरिसी, अगम्य तुझी लीला ॥ या कलियुगी रक्षण करिसी, शाश्वत सनातन धर्मांचे। दीनरक्षण्या अवतार तुझा, पाळण करिसी सर्व धर्मांचे ॥ तव महिमा गाण्या शब्द अपुरे, मज-जवळी हे साईशा। उद्धरी मज सत्वर महेशा, श्रीरामचंद्रप्रभु तूच साईशा ॥ तुझे स्तवन जे जन करिती, अभय देऊनि, नाशी त्यांचे अज्ञान। शरण आलो, मज तत्स्वरूपी मिळवी, कृपासागरा, देई हे प्रसाददान ॥

नमो नमो तुज साईशा। नमो नमो तुज साईशा।

# गावे प्रभु गुणगान

उठता बसता श्रीरामाचे गावे प्रभुगुणगान
सौख्य दु:खही रामजपाने होते सर्व समान ।।
कर्तव्यी नित दंग होऊनी दुज्यास द्या सावली
नरकासुर वध होताच येतसे मंगल दीपावली
सत्कर्माचे चंदन लावूनि राखा अपुला मान
उठता बसता श्रीरामाचे गावे प्रभुगुणगान ......... १
सहजी येते कळोनि सकला अपुले मिंधेपण
अहंपणाच्या ओझ्यानेही येते दुबळेपण
पापाचे ऋण घेऊनि पाठी का व्हावे नादान
उठता बसता श्रीरामाचे गावे प्रभुगुणगान ......... २
जे जे करणे साक्ष तयाला प्रभुची ठेवावी
जलात भिजुनी अंग कोरडे वृत्ति अशी व्हावी
भगवंताच्या दातृत्वाचे गावे जयजय गान
उठता बसता श्रीरामाचे गावे प्रभुगुणगान ......... ३

—श्री. म. पां. भावे
४६, आनंदाश्रम कॉलनी, नौपाडा, ठाणे–४००६०२

# कुणी तरी जाऊनी सांगा निरोप साईला

(चाल—हम तो तेरे आशिक है, फिल्म फर्ज )

कुणी तरी जावूनी सांगा निरोप साईला
भक्त तुझा येवूनी राहिला शिर्डीला
सांगू कुणाला मी सांगू कुणाला .........धृ ।।
किती दिवस वाट पहातो
तुझ्यासाठी हा जीव झुरतो
संसारी व्यापलो मी जीव हा नकोसा झाला
धीर धरवेना साई आता माझ्या मनाला
सांगू कुणाला मी सांगू कुणाला...१
गोकुळीचा तो सावळा श्याम
तसा तू माझा साई घनःश्याम
जाऊ मी कशाला आता काशी गयाला
संजय म्हणे चारी धाम माझे शिरडीला
सांगू कुणाला मी सांगू कुणाला...१

—स्वामी संजयानंद, हिमालय

# कामना

दर्शन दे मजला साईनाथा आता
शरण शरण तुज नाथा सद्‌गुरू साईनाथा ॥१॥

पुजीली समाधी ठेवियला माथा
घे हृदयाशी धरुनी मम हाता ॥२॥

पुलकीत होऊ दे मम काया
दर्शन दे साईराया ॥३॥

तव नेत्रांत मम नेत्र मिळूदे
तव करांत कर माझे जुळूदे ॥४॥

तन मन माझे हरकुनी जाऊदे
तव दर्शने पाप जळूदे ॥५॥

होऊ दे मन कामना ही पुरी
लागू दे तुझा छंद खरोखरी ॥६॥

झाले मम मन हे धुंद
का चाललासी साईनाथा मंद ॥७॥

उदीचा सुवास सुटला
परि साईनाथ नच दिसला ॥८॥

साईनाथा तव जिव का न कळवळला
संकटी पावशी मजला ॥९॥

नम्र होऊनी सुमन विनवी तुजला
साईनाथा दर्शन दे मजला ॥१०॥

—डॉ. सुमन खानविलकर
सीताकुंज, बॉंबे पुना रोड, लोणावळा.

# आशा

आळवू किती मी तुम्हासी
का न होई भेटी मजशी
कुठे न लागे मन
रात्रंदिन तुझे ध्यान
जावे शिरडी हा एकच ध्यास
तुझे मुख कमल पहाण्यास
येईल कारे ऐशी वेळा
पाहीन मी तुजशी या डोळा
वाट पाहूनी थकले आता
नेशील का मज शिरडीस साईनाथा

—डॉ. इंदू नाईक
सीताकुंज बाँबे पुना रोड, लोणावळा.

---

# " वंदना "

सकाळी उठोनी
दर्शन ते घ्यावे
वंदन करावे—साईलागी
सकाळी उठोनी
साईमुख पहा
तेणेसुखे रहा—सर्वकाळ
सुंदर ते मुख
सुंदर ती काया
जडो प्रेम माया—साईचरणी
साई माझी आई
साई माझे बाप
हरो माझे पाप—साईनामी
साई माझे गुरु
साई माझी भक्ती
मिळो मज स्फूर्ती—पुण्यकर्मे

—डॉ. सौ. मालती राहाटे
सामान्य रुग्णालय मु. पो. जि. भंडारा.

# दो घडी साईनाथ का ले नाम तू

दो घडी साईनाथ का ले नाम तू,
छोडकर दुनियाके सारे काम तू।
दो घडी का ध्यान भी रंग लायेगा,
दे समय थोडा सुबह और शाम तू॥
अपने मन को स्वच्छ कर आसन जमा,
मनकी चंचलता को प्यारे थाम तू।
मन किसीका मत दुखाया कर कभी,
कर कभी उपकार के भी काम तू॥
जो धरम के मार्गपर चलता रहा,
पायेगा दुनियामें फिर आराम तू।

—सौ. लता हसमुख पाटील
गुजरगल्ली, मु. पो. नवापूर, जि. धुळे.

* * *

# वेड्यानादीं आम्ही लागलो

[ सॉलिसिटर कै. काकासाहेब दीक्षितांचे हे मनोगत. श्रीसाईदरबारातील अन्य श्रेष्ठ भक्तांचे मनोगतही याहून काय निराळे असणार ? ]

म्हणा आम्हांसी कुणी कांहींहि शहाणे, वेडेपिसे
वेड्यानादी आम्ही लागलो, लाज सोडली असे—१
तुच्छ जाहाले विद्यावैभव, तुच्छहि धनसंपदा
तुच्छ प्रतिष्ठा झाली, उरली निष्ठा श्रीगुरुपदां—२
काय सांगणे विद्वज्जनहो ! ज्ञानोदय ना ग्रंथी
श्रीगुरू उजळी पेंगुळलेली प्रेमे आत्मज्योति—३
मंत्र-देवता-पूजा-जागर, कशास करणें व्याप !
ताप वाढवी तें अवडंबर, कळले आपोआप—४
आम्ही जगासीं नेते-नायक, गर्वहिं ना तो उरे
वेड्यानादीं आम्ही लागलो, झालो वेडे पुरे !—५

—प्रा. र. श्री. पुजारी
रमा निवास, ९९२ सदाशिव, पुणे ३०.

# श्रीसाईकृपा

साईकृपा तारी, तारी संकटी भक्तास !
भाव माझ्यामनी, मनी हिच एक आस !

कामक्रोध नको, नको जीवनात वैरी !
भोवऱ्यात नाव, नाव लागे पैलतीरी !

भजनांत साई, साई माझिया मनात !
विझणारा दीप, दीप उजळे देहात !

मनामध्ये माझ्या, माझ्या साईचीच भक्ति !
देई साई मज, मज अनामिक शक्ति !

अंतरंगी साई, साई भक्ति रंगलेली !
भोवऱ्यांत नाव, नाव काठाला लागली !

—श्री. शिवाजी कौ. मोरे
मु. पो. दोंडाईचा (स्टेशन भाग)
ता. शिंदखेडा जि. धुळे.

# —चला चला लवकर चला—

चला चला, लवकर चला ।
चला आमच्या, साई कडे चला ॥

साई आमचे, बसले शिरडीला ।
चला शिरडीला, सगळे चला ॥

दुःख किती ही, असो तुम्हाला ।
मिटून जाईल, एकदा चला ॥

आलात एकदा, याल पुन्हा ।
हे आमचे घर, हे आमचे बाबा ॥

—श्री. के. एच. भुरानी, बी. ए. एल- एल. बी.
६।३६ प्रभात थिएटर मागे, उल्हास नगर ५.

# सूर

झुळता सुरात सूर
मुखी साईनाम येते !
स्मरता हे थोर नाम
नवतेज अंगी येते !—॥ धृ० ॥

तालात स्पंदनांच्या
हा नित्य कोण गातो !
साईसखा जणू हा
भजनात दंग होतो !
अवचित मुक्या सुरांना
माधुर्य प्राप्त होते—॥ १ ॥

साईचा गाण्या महिमा
कागद हवा नभाचा !
सागरची करूनी शाई
बोरू हिमालयाचा !
घेऊनी तेज त्याचे
दिवसास नूर येते—॥ २ ॥

भरला जळी स्थळी हा
विरला हा वायुसंगे
दंगतात भक्त येथे
पाहुनी वीणा मृदंगे
गुणगान या प्रभुचे
आसमंत सर्व गाते—॥ ३ ॥

— 'अमन

# हाक

साई–साई म्हणोनिया
घुमे मंदिरात पावा !
डोळे पाहूनी थकले
प्राण कुडीतूनी जावां !
साईसख्याने ऐकली
माझ्या भक्तीचीया हाक !
लाख नामातले गावे
मुखी साईनाम एक !

—श्री. डी. बी. जगत्पुरीया " अमन "
मु. पो. शिरूड ( सें. रेल्वे ) ता. जि. धुळे

# गातो साई तुझे गीत

माझ्याच मुखाने गातो साई तुझे गीत
मन मंदिरात मी लावियली तव भक्तीची ही ज्योत
मला पूर्णानंद प्राप्ति मिळो तुझीया छायेत
तुला भेटण्या नामाची जोड हवी हृदयात
चारीधाम फिरलो नाही, नाही देखिला भगवंत
परि चित्त शुद्धि होता दिसलासी तू हृदयात
आता नाही उरली कसली जीवनातही खंत
ज्ञानदीप मम अंतरीचा तो असाच तेवू दे शांत

—श्री. रमाकांत पंडित
प्रभास्मृती, भाऊदाजी रोड, माटुंगा मुं. १९

# साई प्रणति

श्रीशिरडी साई नमोस्तुभ्यं
वरदे भक्त जन रक्षकं
द्वारकामाई निवासम
करूणा मानसम नमाम्यहं ।।
भजे हं साई रूपं
भजे हं साई नामम
भजे हं नवनीत मानसम
भजे हं भव भय हरम ।।
साई रूपं शोक नाशनम
साई नामम परम पावनम
साई दरशनं संकट हरम
साई ध्यानम घोर पाप हरम ।।
भक्त जन मानस विहारम
भक्ति, रक्ति जीवनमुक्ति साईनामम
काँति पुंजम साई भजनम
शांति धामम साई निलयम ।।
साई रामँ रक्षमाँ रक्षमाँ
साई रामँ पाहिमाम पाहिमाम ।।

ॲडव्होकेट—श्री. कोलनपाक मुरलीधर राव
बी. एस्‌स्सी. एल. एल. बी. न्यायवादि
रामगिरी नलगोंडा आं. प्र.

## श्री. कर्णिक यांचे निधन

श्रीसाईबाबा संस्थानचे एक जुने कार्यकर्ते श्री. गंगाधर त्रिंबक कर्णिक शनि. ता. १२-१-८० रोजी वयाच्या ८२ व्या वर्षी मुंबई मुक्कामी निधन पावले. १९५४ ते १९६४ या काळात मुंबई कार्यालयात ते कार्यालय अधिक्षक या पदावर होते. श्रीसाई मृतात्म्यास चिरसद्‌गती देवो.

# जाऊ शिरडीला

चल कर जाण्याची तयारी, जाऊ शिरडीला
आज पाहू गडे पाहू, साईबाबाला...।। धृ० ।।

गुरुस्थान, द्वारकामाई, खंडोबा मंदिर, चावडी
जाते, पोते, अक्षयधुनी बाबांच्या आवडी
होऊ दे उशीर बागेला जाऊ शिरडीला
आज पाहू गडे पाहू, साईबाबाला ।। १ ।।

शनिदेव, गणपति आणि शंकरजीचे मंदिर
अल्पावधीत पाहून येऊ, आता लवकर, लवकर
चालली गर्दी आरतीला जाऊ शिरडीला
आज पाहू गडे पाहू, साईबाबाला ।। २ ।।

भक्तीभावे चिंतन करुनी, प्रेमे आळवू बाबा
लेंडीबागेत शांतप्रहरी जाऊन पाहू शोभा
राहीले बाबा गं वस्तीला जाऊ शिरडीला
आज पाहू गडे पाहू, साईबाबाला ।। ३ ।।

शिरडी जाऊन वंदू साईना विनम्र भावे आता
सौख्य नांदेल घरात आपुल्या दर्शनास जाता
कर तयारी जाण्याला जाऊ शिरडीला
आज पाहू गडे पाहू, साईबाबाला ।। ४ ।।

चल कर जाण्याची तयारी, जाऊ शिरडीला
आज पाहू गडे पाहू, साईबाबाला

—श्री. रमेश चव्हाण
१९९ गुजरलेन, नवापूर, जि. धुळे

## —: स्वप्न :—

स्वप्नात मजला
दिले तू दर्शन
हात मी जोडून
धन्य झालो
मिटलेले डोळे
जोडलेले हात
मिटले तयात
राहो प्राण

—श्री. गं. दे. कुळकर्णी
'कुलदीप' तांबरी, उस्मानाबाद.

## कृपा अशीच राहू दे !

अशीच राहू दे तुझीच कृपा
साई मजवरती
जन्म मानवी मिळता इच्छा
दुजी नसे चित्ती ॥ धृ० ॥
सूर्यचंद्र हे तुझेच डोळे
ग्रह तारे दृष्टी
दिवस रात्रीचे विविध सोहळे
विचित्रहि सृष्टी
तुझीच सारी किमया "बाबा"
आधार तू अंती ॥ १ ॥
सुखदुःखाचे वाहती वारे
येथे दाही दिशा
भवसागरी तरती घेता
(नांव) तुझे जगदीशा
भावभक्तीने उदी लावता
मिळते सद्गती ॥ २ ॥

—श्री. विजय द. हजारे एम्. ए.
सी/६ गुंफादर्शन हाऊसिंग सोसायटी
फर्स्ट कार्टर रोड बोरीवली-पूर्व मुंबई ६६.

# श्रीसाईनाथ

विसरलास तूं मला, विसरले न मी तुला
ध्यास तुझा सतत मम, अंतरी लागला
विसरलास तूं मला
हिणवती कुणी मला, साई-भक्ति प्रेमला,
शरीर भोग हा तुझा, कां न अजून संपला ?
विनविते पुन्हा पुन्हा, निंदू नका साईंना
भोग भोगते जरी, स्मरून पूर्व प्राक्तना
जरी मनासी वेदना, जाऊ शरण मी कुणा
साईंपदी अढळ प्रेम, हीच माझी भावना
विसरलास तूं मला

—सौ. लुसी गंगाधर शुक्ले
" तारक " पोलीस ग्राऊंडजवळ
खारीवाव, बडोदे

# सायं-प्रार्थना

सायंकाळी एक बालिका, उभी दिसली मज साईंपाशी ।
प्रार्थित होती हात जोडूनी, म्हणे देईं मज बुद्धी सुरेखशी ॥ १ ॥
बाल वयाची प्रेमळ-मूर्ति, होती निरागस शुद्ध मनाची ।
आणिक होती कांति मुखावर, साक्ष जणु तिच्या दृढभक्तीची ॥ २ ॥
तिथेच होते लोक अनेकही, करित बोलणी निष्क्रियतेची ।
ध्यानि न त्यांच्या तिचि उपस्थिती, आणि मूल्यता साई-कृपेची ॥ ३ ॥
गोष्ट लहानशी परि मोलाची, जिवाशिवाच्या गाठीभेटीची ।
उमज घेऊनि आचरिल त्याशी, पटेल खात्री साई-दयेची ॥ ४ ॥
तन्मयतेची तिची प्रार्थना बहु गमली मज हृदयस्पर्शी
मंगलता ही सर्व दिसावी, हीच मागणी साईंपाशी ॥ ५ ॥

—श्री. शाम जुवळे,
जनार्दन भुवन, छबिलदास रोड,
दादर, मुंबई २८

# श्रीसाई रूबाई

साईच्या समाधीवर श्रद्धा ठेवूनी मी आलो
ज्याला कांही आधार नाही, त्याला उदी घेवुनी आलो–
भक्तांची गर्दी पाहून दंग मी होऊनी गेलो.
किर्तीमय मूर्ती पाहुन मग्न मी होऊनी आलो
पाहता पवित्र सृष्टी ही 'दृष्टी' घेवुनी मी आलो
'वेड्याचे शहाणे रूप' ऐकून मी थक्क झालो.
मी कधी कसा काय झालो ? अपंगाचा पाय झालो
साईच्या सान्नीध्यात 'दुधावरची साय' झालो.
साईच्या समाधीवर श्रद्धा मी ठेवुनी आलो.
ज्याच्या गावी उजेड नाही त्याला प्रकाश
घेवुनी आलो.

## —: साई गझल :—

शिर्डीत भक्तीत गुदमरूनी आज गेलो।
सावरीत पाप माझे पुण्यवान होऊन आलो ॥ १ ॥
समाधीत साईच्या विसरूनी मला गेलो ।
'तेल नसता दिप पेटला' आठवीत मी आलो ॥ २ ॥
आठवित रूप ते धुप जाळीत मी आलो ।
सुवासात खुप त्या हरवुनी मी गेलो ॥ ३ ॥
रक्षणास 'उदी' घेवुनी मी आलो ।
समाधीत श्रध्दा ठेवुनी मी गेलो ॥ ४ ॥
समाधीत साधे गीत गावुनी मी गेलो ।
पुण्यवान नगरीत न्हाऊनी मी आलो ॥ ५ ॥

—श्री. जगदीश देवपुरकर
ग. नं ५।२६४३ 'सुलोच' धुळे

# श्रीसाई–एक मांगन !

(अहिराणी गीत)

एक मांगु मागन, तुले साईनाथ
बिना तेलनी कशी, लावू सांजवात ॥ धृ ॥

गरीबीना सौसार
खावानी मारामार
हाल मना देख, तुले नही याद ॥ १ ॥

गरीब मना भरतार
राबस ऊन मझार
कशी नही तुले, दया येत ॥ २ ॥

आज ऊनी दिवायी
बारा महिनानी दिवायी
माले कोनी नथी, तुच मना बाप ॥ ३ ॥

तुनीच करू भक्ति
तुले उतारु आरती
येजो लवकरी, मन्हा साईनाथ ॥ ४ ॥

— सौ. लीला डी. मराठे
काठी बंगाला, साक्री रोड, धुळे.

# साई दिनांचा वाली

साई दिनांचा वाली। शिर्डीची रेषा आखली।
दुनिया चकीत झाली। किमय्या धम्मात न्हीली ॥

साईनाथाने कमाल केली। शिर्डीत लावूनी वत्ती।
शिर्डी नटून सजली। स्वर्गाची शोभा आली ॥

प्रिय साईची प्रेमळ माया। दिनदुबळयांचा साईसरदार।
शिर्डी नगरी पवित्र भूमी। श्रीसाईबाबांचा दरबार ॥

—श्री. सूर्यकांत रघुनाथ दळवी
६५/१९३० पंतनगर, घाटकोपर, मुंबई ७५

# शिर्डी पती साइनाथ

शिर्डीपती साईनाथ तुमको लाखो प्रणाम
तुमको मेरा प्रणाम
दीन दयाळू दाता तुमको लाखो प्रणाम
तुमको मेरा प्रणाम
साईनाथ हैं नाम तुम्हारा
मेरे जीवन का है सहारा
हम सबके रखवाले, तुमको लाखो प्रणाम
मन मंदीरकी ज्योत जलावो
भव सागरसे पार उतारो
पानीमें ज्योत जलाने वाले तुमको लाखो प्रणाम
मानवता का मंत्र सिखाया
जात पंथका भेद मिटाया
सबको गले लगाने वाले, तुमको लाखो प्रणाम
हम सेवक हैं सबही तुम्हारे
पडे चरणमें आशिष मांगे
मुक्ति दिलाने वाले, तुमको लाखो प्रणाम
शिर्डीकी यह पुनित भूमीपर
धुनी अखंडीत तूने जलाई
हमारे पाप जलाने वाले, तुमको लाखो प्रणाम
माता पिता तुम सब कुछ मेरे
बालक हम हैं प्यारे तेरे
अपने शरण में लेने वाले, तुमको लाखो प्रणाम
दीन दयाळू दाता तुम हो
मेरे भाग्य विधाता तुम हो
कर दे बेडापार, "चंदु" को लेले शरणमें आज
तुमको लाखो प्रणाम तुमको मेरा प्रणाम ।।

—सौ. चंद्राबेन विठ्ठलदास भाटे
द्वारा डॉ. व्ही. के. भाटे,
१७/३ जयंतव्हिला, किडवाईरोड, वडाळा मुं. ३१

## कल्पना गीत

पणतीत घालुनी पाणी ।
बाबाने उजळल्या ज्योती ॥ धृ ॥
नाहीच दिधले तेल कोणी ।
म्हणुनी घातले त्यात पाणी (बाबाने) ॥ १ ॥
दाविला चमत्कार साई ।
लागले तुझ्याच पायी ॥ २ ॥
शुद्ध ज्याचा भाव, शुद्ध ज्याचे मन ।
तेथे साईचे स्थान (बाबाने)

—सौ. शारदा वाकनीस
केंद्रीय कर्मचारी वसाहत
(अँटाप हिल) कोळीवाडा,
ब्लॉक नं. ५५० मुंबई नं. ३७.

## अमृत

मधुर मधुर मधुर किती
नाम तुझे साई,
श्रद्धेने आळविता
संकट हरण होई ॥ धृ ॥
उदीची तुझ्या महती थोर
हरी सारे देह भोग,
चिमट्याने केली लीला
धुनीमाई पेटविला ॥ १ ॥
वसुधेवरी 'अमृत' गमे
जिच्या सेवने,
असाध्य रोग साध्य जाहले
साई चरणी मन रमले ॥ २ ॥

—सौ. सरला सूर्यकांत गर्जे
आरवाडे बिल्डिंग, शिवाजीनगर, पुणे.

# साई देईल शक्ती

खोल पाण्यात नाव
दूर राहिले गाव
सारे गोठले भाव
मुखी साईचेच नांव
साई देईल शक्ती
ही श्रद्धा अपार
संकटांच्या लाटातून
नाव नेईल पार,

—श्री. उज्ज्वल वामन कुलकर्णी
बी. एसस्सी. बी. एड.
८९६/१ तांबोळी गल्ली, नंदुरबार

# कर्म जाणिले कुणी।

कर्म जाणिले कुणी हो श्रीसाई सद्‌गुरु वाचुनी
वर्म जाणीले कुणी हो कर्म जाणीले कुणी
जिव घेतो झोके सुख दुःखाचे
ह्या अवनीवरती हो कर्म जाणिले कुणी हो
श्रीसाई सद्‌गुरुवाचुनी वर्म जाणिले कुणी
जगी असंभव फल कर्माला। तनु श्रमल्यावीना हो
दैव जाणीले कुणी हो कर्म जाणीले कुणी
तरी फलावर ठेऊनी दृष्टी
नको करू कुठल्या गोष्टी
श्रद्धे वाचुनी नाही प्रगती
ह्या जीवनी जगती हो
दैव जाणीले कुणी हो श्रीसाई सद्‌गुरुवाचूनी
कर्म जाणीले कुणी हो वर्म जाणीले कुणी

—सौ. कलावती व. चव्हाण
बी। ६ अंबाबाई मिस्त्री निवास
सेनापती बापट मार्ग, दादर मुंबई ४०००२८.

# साई तारनहार

चिन्ता छोडकर चिन्तन कर तू
होगा बेडा पार
पगले ! साई तारनहार ॥ टेक ॥

जीवन पाकर व्यर्थ गंवाया
क्या खोया तूने क्या पाया ?
हिसाब करके, बतला तेरी
जीत हुई या हार ॥ १ ॥

असार संसार भवसागर
पार पाना है अति दुस्तर
साईं चिन्तन निसदिन तू कर,
साईं खेवन हार ॥ २ ॥

अहं की वाणी क्यों तू बोले ?
मधुर वचन यों अंतर खोले
साईं प्रेम में नाचे डोले,
द्वारे वंदनहार ॥ ३ ॥

चिन्ता से यों जलता है तन
चिंतन से नित खिलता है मन
मन चंगा तो उमडे गंगा,
होवे मोद अपार ॥ ४ ॥

कलियुग में है एक उपाय
साईनाम ही करें सहाय
साईं चिंतन, ध्यान से पगले !
टूटे बंध हजार ॥ ५ ॥

—श्री. राधाकृष्ण गुप्ता 'चेतन'
पाटकरवाडा, भगतसिंग पथ
डोंबिवली (पूर्व) जि. ठाणे

# एकमेव साईबाबा

नाही पाहिली जात गोत । सर्वांवरी प्रेम अमित
जीवाभावाने करीत एक साईबाबा ।।

असो हिंदू वा यवन । असो पार्शी वा ख्रिश्चन
मानी सर्वांना समान । एक साईबाबा ।।

असो सुष्ट व दुर्जन । असो दुष्ट वा सज्जन
करी तयांना पावन एक साईबाबा ।।

दृढ धरी जो चरण । येई अनन्य शरण
टाळी त्याचे जन्ममरण एक साईबाबा ।।

जगी झाले संत महंत । कनवाळू कृपावंत
मज वाटती दयावंत । एक साईबाबा ।।

—सौ. उषा प्र. अधिकारी
बंदररोड, रत्नागिरी

# सुंदर रुप मनोहर साई रे

सावळ्या श्री हरी रंगाचे ।।
मोहूनी मना वेधले । साई नामी गाईले ।
गोविंदाची गुणी लेकरे । साई संगे मन रंगले ।। धृ ।।

पंढरीचा तो हा पांडूरंग ।
गोकुळीचा तो श्रीरंग ।
अयोध्येचा प्रभू रामचंद्र ।
शिर्डीचा माझा साईराम ।
रुप त्याचे मनी पाहिले साई संगे मन रंगले ।
बाबा संगे मन रंगले ।। धृ ।।

—श्री. रघुनाथ बाबूराव सांडभोर
५७० दत्तवाडी, पुणे ३०

# — धावा —

माझे साई–आई दर्शन देई ।
धावत ये लवलाही ॥ धृ ॥

लेकरु चुकले
ते गडबडले
रडते धाई धाई ॥ १ ॥

कर गे करुणा
पाजव पान्हा
तुजविण कोणी नाही ॥ २ ॥

मन गलबलले
घेरी येती
कडेवरी घे आई ॥ ३ ॥

अफाट दुनिया
तुझीच माया
खेळ जीव घे बाई ॥ ४ ॥

“मी अन् माझे
केवळ ओझे”
कर गे सरते आई ॥ ५ ॥

श्रद्धा पुरवी
सबुरी शिकवी
ठेवित चरणी डोई ॥ ६ ॥

द्वारका माई
माझ्या हृदयी
दाखव दाखव आई ॥ ७ ॥

श्री. श्रीराम बाळकृष्ण आठवले
एम. ए. बी. टी.
बलवंत सदन, ३४४ नवी पेठ, पुणे ३०.

# यावी निद्रा तुझ्याच पायी

साई विठाई माय माउली, रखुमाई साऽई
यावी निद्रा तुझ्याच पायी, ऐकत भक्तीची अंगाई ।। धृ ।।
ज्ञान-माऊली, योग-माऊली, भक्तांची तर तूच साऊली
दीनांची तू माय-माऊली, पहात आहे तुझी वाटुली
धीर नसे मज आता साई, सत्वर वेगे धावत येई
तुझ्या प्रीतीचे कवाड उघडी, अंकी मजला घेई आई ।। धृ ।।
घोर तिमीरी भवार्णावुनी, ठेंचाळत मी चुके वाटुली
जलावीण ही असे मासळी, तुझ्यावीण तिज नाही वाली
तुझ्या दयेची मशाल उजळी, दिसावया मज मोक्ष-वाटुली
नको दूर तू जाऊ साई, तुझ्यावीण मज नाही वाली ।। धृ ।।
चर्मचक्षुना शक्ती नाही, तुला पहाण्या निर्गुण रूपी
प्रणवा फोडुनी यास्तव येई, फिरूनी एकदा होण्या देही
तपोहीन मी ज्ञानहीन मी, माझ्या पदरी एक शिदोरी
साईनाम ही धरूनी दोरी, वहात आहे मी या सागरी ।। धृ ।।
प्रेम-रज्जु ही ओढुनी साई, घेई मजला तुझ्याच पायी
थकुनी पुरता गेलो साई, आस दुजी मज उरली नाही
यास्तव जाळुनी 'अहं' धूप मी, 'सोऽहं' तेने तुज ओवाळी
अखेरची ही इच्छा साई, यावी निद्रा तुझ्याच पायी ।। धृ ।।

—श्री. **ना. ग. परुळेकर,**
केदार, १७३, अभिनवनगर, बोरीवली मुंबई ६६.

# श्रीसाईबाबा सेवा मंडळ नागपूर

● संस्थेतर्फे नागपूर विवेकानंद नगर येथे श्रीसाईबाबांची नवीन मूर्ती प्राणप्रतिष्ठापीत करण्याचा भव्य समारंभ ३–१२–७९ रोजी करण्यात आला त्या प्रसंगी डॉ. के. भ. गव्हाणकर, प. पू. गोदावरी माताजी, साईबाबा संस्थानचे कोर्टरिसिव्हर श्री. क. हि. काकरे, संत श्री. गुलाबबाबा इ. थोर मंडळी हजर होती. या समारंभाला जोडूनच अखिल भारतीय साईभक्त संमेलनही तिथेच भरविण्यात आले होते.

## एक अभंग

देह आहे माझा श्रीसाईबाबाचा ।
ज्याचे नामस्मरणे विश्राम आहे ।। १ ।।
देह भक्ष्य आहे म्हणती काळाचे ।
मज काळाचेही भय नाही ।। २ ।।
देह साईबाबा आत्मा साईबाबा ।
माझे सर्वकाही तोच आहे ।। ३ ।।
अशा साईदेवाचा मी आहो विकला ।
हरी म्हणे नमस्कार त्याचा त्याला ।। ४ ।।

—श्री. हरीभाऊ बोबडे एम्. ए. बी. एड.
कान्होजीबाबा विद्यालय, अंजनसिंगी

---

## श्रीसाई प्रसन्न

(श्रीसाईबाबाकी गजल पुजाकी)

मेरे साई को पूजना चाहता हूँ ।
पूजा करके तेरी दुआँ चाहता हूँ ।
बहुत दिनोंसे है आनेकी इच्छा (मेरे साईको)
तेरे पास आकर मैं पूजने की इच्छा
तुझे पूजकर साई दुआँ चाहता हूँ ॥ दया ॥ (मेरे साईको)
इजाजत दो मुझे आनेसे पहले ।
तेरे पास आकर पूजनेसे पहले ।
तुझे पूजनेकी इजाजत दो साई ॥ दया दुवां ॥ (मेरे साईको)
तेरे दुआँसेही मेरी जींदगी है ।
मेरी ही नहीं मेरे बच्चोंकी है ॥
तेरे भक्तोंकी है । (मेरे साईको)
आइंदाभी तेरी दुआँ चाहता हूँ ॥
तेरे चरणका दास मैं हूँ राजा
मेरे जींदगीकी तू ही है सहारा
तेरे सिवा मुझे कोई नहीं है दुसरा
तेरे द्वारपर आकर
दुआँ मांगता हूँ । दया मांगता हूँ (मेरे साईको)

—श्री. नृसिंहराजा रामचंद्र देशपांडे
मु. पो. येल्लारेड्डी, ता. निझामाबाद

# " अनाथांचा नाथ "

अनाथांच्या नाथा, देई मुक्ती आता ।
घडवी भेट, मज साईनाथा ॥ धृ ॥
स्वार्थी प्रपंचा, विटलो मी आता ।
तुझे नाव घेता, हरे भव चिंता ॥ १ ॥ धृ ॥ अनाथांच्या
वासना ही माझी, जळता जळेना ।
सावली कृपेची तुझ्या, पडता पडेना ॥ २ ॥ धृ ॥ अनाथांच्या
तुझे नाव आता, नित्य माझ्या ओठी ।
करितो मी दास, भेटीची आस मोठी ॥ ३ ॥ धृ ॥ अनाथांच्या
मी तुझे लेकरू, तु माझी माऊली ।
करि तव कृपेची, मज वरी सावली ॥ ४ ॥ धृ ॥ अनाथांच्या

—सौ. उमा बी. जंगम
बी. ९ मेघवाडी डॉ. एस. एस. राव रोड
लालबाग मुंबई नं. १२

ॐ

# दयासागर 'साई !'

साईनाथ माझा । दयेचा सागर ॥
घालितो पाखर । भक्तांवरी ॥ १ ॥
पंचमहा भूते । ज्याचिया आधीन ॥
तो हा भक्ताधीन । साई माझा ॥ २ ॥
हाक मारिताचि । धाऊनिया येतो ॥
भक्तासी रक्षितो । संकटांत ॥ ३ ॥
काय सांगू मात । माझ्या या साईची ॥
प्रचीती ये त्याची । क्षणोक्षणां ॥ ४ ॥
'नागेशाची' श्रद्धा । साईच्या चरणी ॥
अखंड स्मरणी । 'साई' नाम ॥ ५ ॥

—श्री. नागेश मोगलाईकर, धुळे.
'नागलक्ष्मी;' २८२०; ग. नं. ४;
धुळे. ४२४००१

## ' उदी '

बाबांनी पेटविली
धुनी शिरडीत
महान सामर्थ्य
बाबांच्या उदीत ।

बाबांच्या उदींची
कीर्ति अपरंपार
व्याधीमुक्त झाले
भक्त अगणित ।

किती चमत्कार
या उदीने केले
थक्क करून सोडले
श्रद्धाळू भक्तांना ।

भक्तांना रक्षण
देई हे अग्निकुंड
अजून प्रज्वलित
राहील सदोदित ।

बाबांना स्मरून
लावियली उदी
नाही मज भीति
आता या संसारी ।

## ' समाधी '

बाबांची समाधी
अलौकिक थोर
जाहलो अधिर
दर्शनाला ।

नवसास पावते
बाबांची समाधी
दृढ श्रद्धा धरा
त्यांचे ठायी ।

समाधीवर दृष्टी
पडता भक्ताची
हरली भवचिंता
साधकाची ।

बाबांच्या समाधीचा
अगाध महिमा
स्पर्शिता समाधी
दिव्य अनुभव ।

जाहले दर्शन
परम पवित्र
सर्वस्व अर्पण
तेथेचि केले ।

— श्री. मधुकर वखारे,
वडाळा ( मुंबई ).

# लीलावतारी साई

शुद्धभक्तीचा साई भुकेला । पाहे वाट भक्तांची ।
शिळेवरी बैसून दावितो । विविध रूपे देवांची ।
सख्य भक्ती शामाची पाहूनी । भुलले साई भगवान ।
द्वारका माईत खेळतो । लिलाधारी श्रीकृष्ण ।
भावभक्तीने गणूने स्तविला । साई विठ्ठल ।
मशीद माईत प्रगटला । पंढरीचा विठ्ठल ।
भक्त डॉक्टर ज्याचे । आराध्य दैवत श्रीराम ।
सगुण रूप साईराम पाहतां । विसरला देह भान ।
प्रेमभक्तीने मेघाने पुजिला । साई शंकर ।
मधुर भक्तीने तोषून दिले । लिंग त्रिशूळवर ।
अक्कलकोटी स्वामी दर्शना । जोग करिती याचना ।
साई जाहले स्वामी समर्थ । पुरवाया भक्ताची कामना ।
आरती समयीमुळे फेकिती । सुमनांचा वर्षाव ।
भगवी वस्त्रे घोलप दिसले । साई गुरूवर ।
विविधरूपें दावूनी भक्तांचा । करितो उद्धार ।
शुद्धभक्तीने शांताने नमिला । साई रमावर ।

—सौ. शांता अंबाजीराव सरोदे
उद्भंगल बिल्डिंग, न. चिं. केळकर
पथ, दादर मुं. २८.

## श्री सद्गुरु साईनाथ सेवा मंडळ, लालबाग

● संस्थेतर्फे २९ वे साईभक्त स्नेहसंमेलन ९–१२–७९ ते १५–१२–७९ हा सप्ताह लक्ष्मीवाडी, जयहिंद सिनेमाजवळ मुंबई ३३ येथे उत्साहाने साजरे करण्यात आले. ह. भ. प. नरेंद्रबुवा हाटे यांचे कीर्तन व श्री. दत्ता-मिराशी, साईदास कदम, श्री. वासुदेव बुवा भोवर, रघुनाथ सांडभोर, श्री. शांताराम चव्हाण यांचे गायन-वादन कार्यक्रमा बरोबरच शिरडी के साईबाबा हा चित्रपटही दाखविला गेला.

# श्रीबाबांचा अभंग

[ मुंबईचे सुप्रसिद्ध भजनीबुवा शंकरराव गोलतकर हे १९७७ रामनवमी नंतर शिरडीला आले होते. त्यावेळी त्यांनी स्वतः रचलेला साईबाबांवरचा खालील अभंग गाऊन बाबांविषयींची आपली प्रेम भावना व्यक्त केली होती. ]

धन्य आजी दिन । तुमचे जाहले दर्शन ॥ धृ० ॥
आजी भाग्य उदया आले । देखीली बाबांची पाऊले ॥ १ ॥
कर्ता करवीता शिरडीच्या देवा । सांभाळा दयाळा माय बापा ॥ २ ॥
बहु दिवसांची होतीं आस मनीं । पाहीन मी कधी साई देवा ॥ ३ ॥
पाहोनी हे ध्यान सुखावले मन । आणिले ओढुन आपुल्या पायी ॥४॥
दास म्हणे देवा कृपाकरी दासा । सांभाळा अनंता आम्हा लागी ॥५॥

—प्रेषिका–लीलाताई गोलतकर
अभंग बिल्डिंग, परळ, मुंबई १२

---

# श्रीसाई मंगल

साई । माझे परमेश्वर,
निराशाने मोहित होऊन,
धर्म ग्लानीच्या दुःस्थितीत
माझ्या तत्वज्ञानाची घडी बिघडली आहे ।
बाबा साईनाथा,
ओजस्विता नाहीशी होऊन,
मान हानि झालीं आहे ।
" अकरणान्मन्द करणं श्रेयः "
या न्यायाने,
तुझे नामस्मरण आरंभ करित असो,
देवा साई करुण सागरा,
माझ्या अपूर्णतेला,
पूर्ण कर,
तुझ्यावर प्रेम वृद्धिंगत होवो,
अशी साई चरणी,
नम्र भावाने प्रार्थना करीत आहे !
हे साई आत्मारामा,
तुझ्या स्वरूपाचे, गुणांचे, पंथाचे, चिंतन करू दे !

—प्रा. गुंडेराव पटवारी
यन्. यफ. जे. कॉलेज बिदर, ५८५४०१.

# श्रीसाई गीत

( चाल :– अब तुमबी चले परदेश )

अब छोड जगत के काम, सबेरे श्याम ।
भजो साईराम, जीवन का कौन ठिकाना ॥ ध्रु ॥

साईराम तुम्हारे घडेमें है ।
घट घट की जानन हारा है ॥
है वही तुम्हारा रुप लखो निर्वाना
जीवन का कौन ठिकाना ॥ १ ॥

यह देह छन्निक विन शांती है ।
घृत तेल जरे निमी वाती है ॥
चेतन हो करके क्यों तुम अपनी माला ।
जीवन का कौन ठिकाना ॥ २ ॥

यही मैं काया हूं मानेंगे ।
तण कष्ट मिले तुम जानोगे ।
पर लोग लोग में मिटे न आना जाना ॥
जीवन का कौन ठिकाना ॥ ३ ॥

सुर दुर्लभ नर तन तुम्हें ।
संसार सरित तट तुम्हे मिला ॥
सद्गुरु पदमें रम जावो करके ज्ञाना ।
जीवन का कौन ठिकाना ॥ ४ ॥

यह काया है यह जाया हे ।
जानो स्वप्ने की माया है ॥
सब ओस के मोती ।
रसीस हात नहीं आना ॥
जीवन का कौन ठिकाना ॥ ५ ॥

नित्य ध्यान करो मैं आत्मा हूं ।
विज्ञान पूर्ण परमात्मा हूं ।
मिट जावो देह ध्यास अमर पद पाना ॥
जीवन का कौन ठिकाना ॥

—लीलावती कां. गुजराथी,
शिर्डी

# दयाघन साई

दयाघन साई। परिपूर्णकृपेने पाही।
आले मी रे तव चरणाशी।
नको पाठवू विन्मुख मजशी।
तारिलेस तू अन्य जनाशी।
होऊनी त्यांची आई। दयाघन साई परिपूर्णकृपेने पाही॥ १ ॥

अपार महिमा तुझ्या उदीचा।
वर्णू थकली अमूची वाचा।
भूका तूची रे भाव भक्तीचा।
रक्षसी ठाई ठाई। दयाघन साई॥ २॥

नाना नाटकी करूनी लीला।
धारण करशी किती रुपाला।
पडते कोडे अल्पमतीला।
नकळे मजला काही। दयाघन साई॥ ३॥

तुची साई। तुची आई।
पाहू तुला मी कवण्या ठाई।
सर्वत्रची तू भरूनी राही।
विनित सदा मी तुझ्याच पायी।
दयाघन। परिपूर्णकृपेने पाही॥ ४॥

—सौ. अस्मिता कमलाकर दांडेकर
६९ बी. खाडिलकर रोड गिरगाव मुं. ४

# मुक्तिलक्ष्मी

विजयादशमी दिवस शुभमुहूर्त समय
पवित्र प्रहरी प्रसन्न झाली वसुधा निरामय
शुभमंगल ही वेळा साधून प्रभूने केले प्रयाण
नश्वर सोडूनि विदेही केले श्रीसाई निर्वाण
सद्धर्माचा घेऊन पलिता अखंड फिरला मुनी
सत्य अहिंसा माणुसकीचा मंत्र दिला कथुनी
कैवल्यज्ञाने स्वधर्म साधला आत्मा उद्धरीला
आत्मपिंडी ज्ञानसागर अनाग्रहीने सांगितला
मानवधर्म प्रवर्तक साक्षात् साई अभयंकर
निजात्मकज्ञानी मोक्ष मिळवी तो तेजभास्कर
शिर्डी नगरी देहातून मुक्त केला आत्मा सत्वर
अर्ध शतक एकादश वर्षे झाली निर्वाण महोत्सव भूवर
मुक्तिलक्ष्मीचे स्वागत करू या दीप उजळूनी
महापुरुषाचे स्मरण राहो प्रेमभाव मनामनातुनी...

—**कु. शशिकला साळगावकर,** मुक्तानिवास, १५५, नवीपेठ, सोलापूर

---

# मिळो मानवा दृष्टी नूतन !

मिळो मानवा दृष्टी नूतन !!
दुष्ट रुढीचे करूनी भंजन
त्यज भेदाचे कृत्रिम बंधन
घडो जगाचे सम्यक दर्शन
सद्धर्माचे हो गुण-गायन !

घृणा नाचते वदनी प्रतिक्षण
करी लोभमद हृदयी नर्तन
द्वेष भावना अखंड गर्जन
विश्वप्रेमी कर परिवर्तन !

मानव अन्तर हो भू-विस्तृत
नव मानव्यी हो भव विकसित
जन-मन होवो समया परिचित
घडो मानसी विचार-मंथन !

प्रति शीर्षावर विलसो श्रमकण
मिळो गरीबा यथार्थ शिक्षण
राहण्यास गृह, वस्त्र नि भोजन
होवो सुखमय मानव जीवन !

—**डॉ. विनायक गो. दुर्गे,** ८७९ खरेनगर, धर्मपेठ नागपूर १

# साई महिमा गाऊ या....

साईबाबांच्या शिर्डीला जाऊ या
अन् साई महिमा गाऊ या...॥ धृ ॥
बघा, बघा, हे विशाल मंदिर...!
भक्ति पताका फडके सुंदर...!!
पावन मूर्तिस वंदू या,...साईबाबांच्या...॥१॥

स्वागतास ही बाग बहरली...!
कारंजे ही सहर्ष उठली...!!
निसर्ग शोभा पाहू या,...साईबाबांच्या...॥ २ ॥

शिर्डी क्षेत्री, थकवा जाई
सानंदे मन प्रसन्न होई,
शूचिर्भूत ही होऊ या,...साईबाबांच्या...॥ ३ ॥

भक्त मंडळी, उत्सुक झाली,
दिशा-दिशातून धावत आली,
मंगल आर्ती गाऊ या,...साईबाबांच्या...॥ ४ ॥

मनोकामना सफला होती
ऐसी ज्यांची दिगंत कीर्ती...!
समाधी दर्शन घेऊ या,...साईबाबांच्या...॥ ५ ॥

सारे मानव एक भावना
शिर्डीचा हा विशेष महिमा,
कृतार्थ आपण होऊ या,...साईबाबांच्या...॥ ६ ॥

—श्री. प्र. अ. पुराणिक, एम्. ए. बी. एड,
देशमुखवाडा, कृष्णनगर, धुळे

# उदीचा प्रसाद

द्वारकामाईत धूनी पेटतो अखंड ज्योतीचा ।
घ्याओ प्रसाद हा उदीचा ॥ धृ ॥
संकट समयी धाऊन येई ।
आशीर्वाद गुरूचा ॥ १ ॥ घ्याओ
रोगी पिडीत हे आश्रय घेती
सद्गुरु चरणाचा ॥ २ ॥ घ्याओ
दुखीकष्टी धाऊन येती
अनुभव त्याचा ॥ ३ ॥ घ्याओ
किती भक्ताला हिने दावला
मार्ग रक्षणाचा ॥ ४ ॥ घ्याओ
ज्याला लाभला प्रसाद हा तो
झाला भाग्याचा ॥ ५ ॥ घ्याओ
दत्तू म्हणे साई माझा
सागर हा कृपेचा ॥ ६ ॥ घ्याओ

—श्री. दत्तात्रय महादेव मोरे,
४७० शिवाजी नगर, पुणे ७.

---

# * श्रीसाई तेज *

तेजाने घर भरले,
साई तेज हेच कां ?
साई वदती तेजातून,
'मी' नव्हे तूंच का ? ॥ १ ॥

निरागस बाल्यता,
मधूर शब्द फूले कलिका,
सुगंधी आत्मी वसे परमात्मा,
प्रियतमाची बन सेविका, ॥ २ ॥

मनःभावी कृष्ण सखा,
तूच होऊनी राधिका,
जीवनाच्या गोकूळांत,
फूलव मला हो चोखा ॥ ३ ॥

देव-भक्त समसमान,
विश्वजली, जीवन नौका,
पैलतीरी-आनंदवन,
जा पुढे तूं नाविका ॥ ४ ॥

साईशब्दी रंगले मन,
स्वप्न कीं सत्य ही शंका,
होता अमिट, साई दर्शन,
राहीन आजन्म स्वप्न गायिका ॥ ५ ॥

—सौ. मीना पां. खाडिलकर,
आराधना हौसिंग सोसायटी, कूपवाड रोड, सांगली

# ॥ श्री साईस्तवन ॥

शिरडीस एकदा जो गेला । त्याचा साईपायी भाव जडला ।
साईचे साजिरे रुप पाहुनी । परमानंद वाटे भक्तामनी ॥ १ ॥

समाधीस्थ रुपे असले जरी । संचार त्यांचा त्रैलोक्यावरी ।
लीन होता तव चरणावरी । सदैव वसती हृदयांतरी ॥ २ ॥

त्यांच्या समाधीचे घेता दर्शन । पतित भक्तिहि होती पावन ।
श्रद्धा ठेवी जो त्यावर । लाभे त्यास कृपेचा कर ॥ ३ ॥

भावभक्तिने त्याला पूजिता । संकटी रक्षी सदैव भक्ता ।
त्याचे नित्य नाम घेता । नुरे कशाची चिंता भक्ता ॥ ४ ॥

शिरडीतील द्वारकामाई । भोळ्या भाविकांची ही आई ।
तिच्या अंकी ठेविता डोई । भक्ता उद्धरुनी नेई ॥ ५ ॥

द्वारकेतील प्रज्वलीत धुनी । आहे साईची साक्ष म्हणूनी ।
जोवरी ती राहे प्रज्वलीत । तोवरी साई असती जगतात ॥ ६ ॥

सेविता, लाविता उदी भावे । चमत्कार दावी नित्य नवे ।
जैसा ठेवाल तुम्ही भाव । येईल तैसा तुम्हा अनुभव ॥ ७ ॥

बाबांच्या गुरुचे स्थान । बाबांचे मोठे श्रद्धास्थान ।
तेथे जाऊन उद जाळीता । भक्ता मनी लाभे शांतता ॥ ८ ॥

त्याच्या जवळील निंबवृक्ष । साईबाबांची दूजी साक्ष ।
नित्य टेकूनी त्या वृक्षाला । बाबा बसती चिंतनाला ॥ ९ ॥

बाबांचे शिरडी संस्थान । आहे भक्तांचे श्रद्धास्थान ।
जाऊनी या त्या संस्थानाला । परमसौख्य वाटे मनाला ॥ १० ॥

शिरडीसारखे क्षेत्र पवित्र । नाही जगात दूजे मात्र ।
शिरडीस एकदा या जाऊन । या साईबाबा पाहून ॥ ११ ॥

**सौ. प्रतिभा मंगेश तेंडुलकर**
यमुनासदन, नं. १ खोली नं. ६
विष्णुनगर, ठाणे २

# गोदाकाठी शिर्डी महान

श्रीसाईच्या रुपें आले शिर्डीमध्यें भगवान
गोदा काठी शिर्डी महान ॥ धृ० ॥

प्रसन्न वदने प्रसन्न होयी
भवपाशांतुनी सोडवी साई
भक्ती भावा भुलतो साई
शिर्डीचा भगवान
गोदाकाठी शिर्डी महान ॥ १ ॥

वेषावरुनी दिसे फकीर
दुनियेची करी नित्य फिकीर
झोळी मधुनी शत शत रुपये
वाटीत राही शाम
गोदाकाठी शिर्डी महान ॥ २ ॥

अल्ला मालिक भला करेगा
कोयी न मेरा भूका रहेगा
या वचनांची पूर्तता करी
शिर्डीचा भगवान
गोदाकाठी शिर्डी महान ॥ ३ ॥

उदी प्रसाद करीता भक्षण
साई नाम जप करील रक्षण
दासांच्या या दासावरती
कृपा करी भगवान
गोदाकाठी शिर्डी महान ॥ ४ ॥

— श्री. डी. बी. पोतनीस,
२६।७ एच. बी. पिंपरी, पुणे १७.

# साई जगती एक श्रीपती

साई जगती एक श्रीपती
होवो माझी मला विस्मृती ॥

सदा वसो श्रीसाई चित्ती
कधी न होईल मनोविकृतीं ॥

भगवंता बघ सर्वांभूती
श्रीसाईला हीच विनंती ॥

सत्ता श्रीची अवती भवती
या श्रद्धेने मिळेल शांती ॥

आपुले जगणे त्याच्या हाती
अपुले मरणे कर्माच्या गती ॥

साधूंची साधावी संगती
मिळवुन देई साई सद्गती ॥

श्रीसाई दे सर्वा सन्मती
लौकीकाची असो विरक्ती ॥

साईनाम या असु दे कंठी
निश्चित जाऊ मग वैकुंठी ! ॥

—श्री. विनायक पाठक
राजावाडी, घाटकोपर

# शिरडी-वृत्त माहे नोव्हेंबर सन १९७९

या महिन्यात श्रीसाईबाबांचे दर्शनासाठी बाहेरगावची भक्त मंडळी बरींच आली होती. काही कलाकारांनी श्रीपुढे हजेरी दिली ती खालील प्रमाणेः—

**कीर्तनः**–१) संस्थान गवई काव्यतीर्थ श्री. ग. वि. जोशी शास्त्री यांची कीर्तने नेहमीप्रमाणे झाली.

२) श्रीमती जानकीबाई इंगळे गोरेगाव मुंबई यांचे कीर्तन.

३) ह. भ. प. आबाजी पणशीकर फणसवाडी मुंबई यांचे कीर्तन.

**प्रवचनः**–१) ह. भ. प. नारायण का. कुलकर्णी पंढरपूर यांचे प्रवचन.
२) ह. भ. प. श्री. लक्ष्मणबुवा वाघचौरे शिर्डी, यांचे प्रवचन.

**भजनः**–१) ह. भ. प. संत गुलाबबाबा भजन मंडळ घाटकोपर मुंबई.

**गायन** २) श्री. गजानन श्री. पंडित दादर मुंबई.

**वादन** ३) श्री. अनंत श्री. पंडीत कुर्ला मुंबई. ४) श्री. विपुल अ. कुर्लेकर गोरेगाव मुंबई. ५) श्री. अनंत शां. कुर्लेकर मुंबई. ६) सुनिल कुर्लेकर सौ. शकुंतला कुर्लेकर मुंबई. ७) श्री. दयानंद केशव इंगळे मुंबई. ८) श्री. जयवंत कुलकर्णी मुंबई. ९) श्री. अनिल ज. मोहीले मुंबई. १०) श्री. शंकर अ. फेणाणी मुंबई. ११) श्री. पद्मजा श. फेणाणी मुंबई. १२) कु. विनायक श. फेणाणी मुंबई. १३) श्री. हरीॐ खन्ना लुधीयाना १४) श्री. विजय सुर्वे वरळी मुंबई. १५) सद्गुरु समर्थ साटम महाराज भजनी मंडळ मुंबई. १६) श्री. पंडीत गोपाळराव हैद्राबाद. १७) ह. भ. प. दीनानाथ बुवा ठाकरे नागपूर. १८) ह. भ. प. मुकुंद कृ. म्हात्रे वसई. १९) ह. भ. प. महिला संगीत भजन मंडळ मुंबई. २०) प. पूज्य नारायण महाराज भजनी मंडळ कुर्ला मुंबई. २१) श्रीसरस्वती संघ भजन, ग्वाल्हेर. २२) श्री. खैतसिंग २३) श्री. नारायण सिंग २४) श्री. मदनलाल २५) श्री. धरमपाल. २६) श्री. अस्वार हुसेन अजमेर. २७) श्री. मनोहर बा. कदम २८) श्री. अरविंदराव म्हात्रे मुंबई. २९) श्री. भालचंद्र व्यवहारे. ३०) श्री. शिरीष चिटणीस कल्याण. ३१) श्री. सह्याद्रि बॅण्ड पथक चेंबूर मुंबई. ३२) श्री. सिद्राम भि. जाधव, श्री. चिदानंद सिद्राम जाधव सोलापूर. ३३) श्री. बाबुराव सिद्राम. ३४) राजेन्द्र वि. भवाळ सोलापूर. ३५) गुरुसेवा भजन मंडळ वरखेड. ३६) श्री. अशोक बेलारे मुंबई. ३७) उदय रायकर मुंबई. ३८) श्री. ज्ञानदीप गायन पार्टी ठाणे. ३९) श्री. श्रीकांत मिश्रा, बैतुल. ४०) श्री. आनंद श. गायकवाड ठाणे.

**तुळशी विवाह** –श्रींचे द्वारकामाईत सालाबादप्रमाणे तुळशी विवाह कार्यक्रम संपन्न झाला. संस्थान कर्मचारी व साईभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांना प्रसाद वाटण्यात आला. मुलांनी फटाके, भूईनळे लावून आनंद व्यक्त केला.

**माननीयांच्या भेटी—**

१) मा. श्री. जी. एस. पांडे, धर्मादाय आयुक्त महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) मा. श्री. आर. पी. रणदिवे, धर्मादाय उपआयुक्त पुणे.
३) मा. श्री. विलासराव पाटील, सहाय्यक आयुक्त, पुणे.
४) मा. श्री. अर्जुनराव कस्तुरे, समाज कल्याण मंत्री, महाराष्ट्र, मुंबई.
५) मा. श्री. एन. पी. भणगे. प्रांताधिकारी, संगमनेर.
६) मा. श्री. जी. जी. पनधरकर, अवर सचिव, महसूल व वनखाते, महाराष्ट्र.
७) मा. श्री. आर. डी. रणदिवे, उपसचिव, सामान्य प्रशासन, मुंबई.
८) मा. श्री. बबनरावजी ढाकणे, राज्यमंत्री, सहकारी, बांधकाम खाते, महाराष्ट्र. जनता पक्षाध्यक्ष, महाराष्ट्र.
९) मा. श्री. एस. बी. सिंग, वरिष्ठ सैनिकाधिकारी.
१०) मा. श्री. फडतरे, सहाय्यक महा व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन मुंबई
११) मा. श्री. शिवाजीराव चौधरी, पोलीस उपमहानिरीक्षक. सशस्त्र बल, पुणे.
१२) मा. श्री. रमाकांत कुळकर्णी, पोलीस उपमहानिरीक्षक गुन्हा अन्वेषण (CID) शाखा, महाराष्ट्र.
१३) मा. श्री. सी. आर. रंगनाथ, IAS, कार्यकारी अधिकारी, डी. पी. ए. पी अहमदनगर.
१४) मा. श्री. जे. एस. सहाय, IAS, प्र. सहाय्यक जिल्हाधिकारी अहमदनगर.
१५) मा. श्री. एस. एम्. फाटक IAS, —„—
१६) मा. श्री. आर. बी. कानडे IAS, —„—
१७) मा. श्री. महमदखान BAIF, अहमदनगर.
१८) मा. श्री. एस. प्रभाकरन, IAS, जिल्हाधिकारी अहमदनगर जिल्हा.
१९) मा. श्री. संत नारायणबाबा महाराज, कुर्ला, मुंबई.
२०) मा. श्री. आर. जी. साळवी, (निवृत्त) IAS.
२१) मा. श्री. एस. एस. आंबडेकर, उपमुख्य अभियंता, विद्युत् महामंडळ, पुणे.
२२) मा. श्री. आर. एस. रामाराव, अधिक्षक अभियंता, विद्युत महामंडळ, पुणे.
२३) मा. श्री. एस. डी. देशपांडे, लेखा संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२४) मा. श्री. रमाकांत कदम, सहाय्यक धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र, नासिक.

२५) मा. श्री. अरूण गुप्ता, IAS, उपसचिव, वाणिज्य मंत्रालय, नवीदिल्ली.
२६) मा. श्री. एम्. एस. पेंडसे, उपसचिव भूमी विभाग, मुंबई.
२७) मा. श्री. के. आर. आंगवळकर, अवर सचिव, भूमि विभाग, मुंबई.
२८) मा. श्री. अभ्यंकर, सहाय्यक पोलीस आयुक्त, पुणे.
२९) मा. श्री. व्यंकटप्पा, सदस्य, आयकर अपील न्यायाधिकरण, पुणे.
३०) मा. श्री. डी. सी. देसाई, अवर सचिव, उद्योग व मजूर खाते, महाराष्ट्र मुंबई.
३१) मा. श्री. के. बी. जितकर, भूतपूर्व जिल्हाधिकारी, अहमदनगर.
३२) मा. श्री. भाटिया, वरिष्ठ सैनिकाधिकारी.
३३) मा. श्री. सक्सेना, IAS, जिल्हाधिकारी, होशंगाबाद.
३४) मा. श्री. पुरंदरे, सहाय्यक संचालक, उद्योग पुणे.
३५) मा. श्री. राजीव अगरवाल, IAS, अपर जिल्हाधिकारी अहमदनगर.

**हवापाणी :–** शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही. आठ दिवस पाऊस चालू असल्यामुळे हवेत गारवा आहे.

* * *

## शिरडीचे श्रीसाईबाबा

● निर्माते श्री. शरद गाळवणकर यांच्या श्रीदत्त फिल्मसने "शिरडीचे श्रीसाईबाबा" या मराठी चित्रपटाचे सर्व हक्क आता मिळविले आहेत. या सुंदर चित्रपटात कै. श्री. दत्तोपंत आंग्रे यांनी साईबाबांची अप्रतिम भूमिका वठविली असून श्री. साळवी, मधु आपटे, चित्रा, धुमाळ यांच्याही त्यात भूमिका आहेत. या चित्रपटाचे दिग्दर्शन कुमार सेन समर्थ व संगीत श्री. पांडुरंग दिक्षित यांनी दिले आहे. न्या. श्री. एन. के. पारीख, श्री. का. सी. पाठक, माजी कोर्ट रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान शिरडी, श्री. सदानंद चेंदवणकर का. संपादक श्रीसाईलीला डॉ. अ. का. पाठक, डॉ. प्रा. चारुशिला गुप्ते इ. प्रतिष्ठीतासमोर हा चित्रपट श्री. गाळवणकर यांनी शनि. ता. १९ जानेवारी ८० रोजी दुपारी ३ वा. ॲकमी प्रिव्ह्यु थिएटर, ताडदेव येथे दाखविला.

# ग्रंथ पारायण

श्रीसाईबाबा संस्थान शिर्डी कर्मचारी व साईभक्त या सर्वांनी मिळून श्रीसाई-बाबांच्या लेंडी बागेत दि. २२-११-७९ ते २९-११-७९ पर्यंत खाली नमुद केलेल्या ग्रंथाचे पारायण :—


१) श्री. गुरु चरित्र २) श्रीगुरु लीलामृत ३) श्रीज्ञानेश्वरी ४) श्रीगजानन विजय ५) श्रीसाई सत्चरित ६) श्रीशिवलीलामृत ७) श्रीनवनाथ ८) श्रीनागझरी महात्म्य.

## पारायण करणाऱ्यांच्या नावांची यादी.

१) श्री. मारुती गुणाजी मांडवकर उर्फ बारकुशेट. २) श्री. शशीकांत एकनाथ दळवी ३) श्री. सुरेश राजाराम आंजर्लेकर ४) सौ. संकेता सुरेश आंजर्लेकर ५) श्री. दत्ता पांडूरंग नेराळे ६) श्री. विजय पांडूरंग पांजरी ७) श्री. प्रकाश दशरथ खळदकर. ८) श्री. भानुदास गावडे ९) श्री. रवी वासुदेव तळवलकर १०) डॉ. व्ही. एम डिक्कर ११) सौ. ताई डिक्कर १२) श्री. वसंतकाका रासने १३) श्री. नवनाथ शंकर सालकर १४) श्री. गोरख बाळा वाणी १५) श्री. लोटण गंभीर पाटील १६) श्री. रामराव रंभाजी शेळके १७) श्री. विष्णू पुंजाजी गोंदकर १८) श्री. रामदास मारुती कोते १९) श्री. सोपान राघुजी जगताप २०) श्री. प्रल्हाद गंगाधर शेळके २१) श्री. प्रकाश प्रभाकर देशपांडे २२) श्री. चंद्रकांत बापूराव मुळे २३) श्री. सुभाष किसनराव जगताप २४) श्री. अरविंद कुलकर्णी २५) श्री नारायण केशव कुलकर्णी २६) श्री. अशोक जगन्नाथ गोंदकर २७) श्री. अशोक शंकर सालकर २८) श्री. लक्ष्मण नागोजी गायकवाड २९) श्री. माधव घारे ३०) श्री. अप्पा खंडूजी कोते. ३१) श्री. पितांबर ओंकार पाटील ३२) श्री. रायभान चंद्रभान गुंजाळ ३३) श्री. मुरलीधर भिकाजी सोनवणे ३४) श्री. विजय भालचंद्र कुलकर्णी ३५) श्री. सोमनाथ रंगनाथ गोरक्ष ३६) श्री. अर्जुन निवृत्ती सुपेकर ३७) सौ. दाणे काकू ३८) सौ. वत्सला अवधुतराव शिंदे ३९) श्रीमती रजपूत आजी ४०) गजानन रामराव कुलकर्णी.

---

पारायण संकल्पपुजा, समाप्ती पुजा आणि त्या निमिताने श्री सत्यनारायण महापूजा मा. श्री. क. हि. काकरे, कोर्ट रिसीव्हर यांचे शुभहस्ते करण्यात आली. पारायणाचे समाप्तीचे दिवशी दोन हजारांचेवर गोरगरीबांना अन्नदान करण्यात आले.



**प. पू. महामना श्री राधाकृष्णस्वामीजी**

अलीकडील दुर्मिळ छायाचित्र

जन्म १५ एप्रिल १९०२ ]

[ निर्वाण १४ जानेवारी १९८

# प. पू. राधाकृष्णस्वामीजींचे महानिर्वाण

श्रीसाईबाबा संस्थान शिरडीचे नव्हे, साईभक्तांचे नव्हे तर अखिल मानवजातीवर निर्व्याज अलोट प्रेम करणारे त्यागी व निस्वार्थी वृत्तीचे थोर संत प. पू. राधाकृष्णस्वामी उर्फ श्रीसाईपादानंद याचे सोमवार-मकरसंक्रांत-ता. १४ जानेवारी १९८० रोजी रात्री १०-३० वा. बंगलोर येथे महानिर्वाण झाले हे लिहिण्यास आम्हास अत्यंत दुःख होत आहे. गेले तीन चार महिने स्वामीजींची प्रकृती ठीक नव्हती पण त्यांना बरे नक्कीच वाटेल व पुन्हा ते मुंबईस येतील अशी आशा आम्हांस वाटत होती. गत साली श्रीसाईलीला लेखक-कवी स्नेहसंमेलनास शिरडीस ते हजर होते व यंदाच्या संमेलनासही ते हजर रहाणार होते. निर्वाण समयी त्यांचे वय ७८ वर्षांचे होते.

लांबचलांब भरघोस पांढरी शुभ्र दाढी, सदासर्वकाळ, कोणत्याही ऋतूत अंगावरून लपेटलेले फक्त पांढरे शुभ्र स्वच्छ धूत वस्त्र, सदा हसतमुख प्रसन्न पण तेजस्वी चेहरा असलेली साईभक्त तपस्वी व्यक्ती आज आपल्यातून गेली आहे. श्रीसाईबाबांच्यावरची गाढ श्रद्धा व भक्ती, त्यांचे जपजाप्य, नामस्मरण, साईभक्तीचा प्रचार प्रसार इ. सेवाकार्यामुळेच की काय त्यांची नियुक्ती अखिल भारतीय साईसमाज, मद्रास या ज्येष्ठ व श्रेष्ठ संस्थेच्या अध्यक्षपदी करण्यात आली होती. एक उच्च कोटीचे ऋषी तुल्य संत म्हणून सारा भारत त्यांना ओळखत होता. राष्ट्रपती संजीव रेड्डी तर त्यांचे समोर नतमस्तक होत असत. भारतातील अनेक ठिकाणच्या मंदिरांचे पायाभरणी व उद्घाटन सोहळे त्यांच्याच शुभहस्ते पार पडलेले आहेत तर असंख्य अधिवेशने त्यांच्याच उपस्थितीत साजरी झालेली आहेत. खुद्द बंगलोर येथे आपल्या श्रीसाई स्पिरीच्युअल सेंटरमध्ये १९७८ साली श्रीसाईबाबांची पूर्णाकृती मूर्ती त्यांनी प्रतिष्ठापीत केली होती.

श्री राधाकृष्ण स्वामीजींना साईबाबा प्रसन्न होते. कामाक्षी देवतेबरोबर ते अक्षरशः खेळलेले होते. कार्ल्याच्या एकवीरा देवीने त्यांना दर्शन दिले होते, भगवान दत्तात्रेयांनी त्यांना असंख्यवेळा दृष्टांत दिले. दक्षिणेत श्रीसाई-भक्तीचा प्रसार-प्रचार करणारे श्री नरसिंह स्वामीजी तर त्यांच्याकडे इतके आकृष्ट झाले की आपल्या पश्चात् आपली परंपरा पुढे चालविण्यासाठी म्हणून त्यांनी स्वामीजींचीच निवड केली होती. राधाकृष्ण स्वामीजी शंभर टक्के अंतेवासी होते. साई प्रचारार्थ त्यांनी देशभर दौरा केला होता. त्यांची असंख्य भक्त मंडळी देशभर विखुरलेली आहेत. स्वामीजींच्या निर्वाणाने त्या सर्वांनाच अपरंपार दुःख होणे अगदी सहाजिक आहे. पण ईश्वरी इच्छेपुढे कोणाचे काय चालणार ! त्यांच्या आत्म्याला चिरशांती मिळो अशीच इच्छा आता व्यक्त करतो. दिवंगत स्वामीजींना आमचे कोटीकोटी प्रणाम

# मांगल्याची ज्योत

[ कर्ती व प्रकाशक श्री. रमाकांत नागेश पंडित, प्रभास्मृती, भाऊदाजी रोड, माटुंगा, मुंबई, पाने ६०, किंमत ३ रु. ]

श्रीसाईलीलेचे एक गुणी लेखक श्री. रमाकांत पंडित यांनी लिहिलेल्या कवितांचा संग्रह दादर येथे समारंभपूर्वक प्रकाशित झाला होता. या काव्यसंग्रहात श्री. पंडित यांनी लिहिलेली श्रीसाई गीते व इतर भक्ती गीते समाविष्ट करण्यात आली असून ती सर्व भक्ती प्रेमाने ओथंबलेली आहेत. पुस्तकात श्री. रमाकांत यांचे अल्पचरित्रही देण्यात आलेले असून आतापर्यंत कसकशा परिस्थितीतून त्यांनी वाटचाल केली यांची कल्पना येते. श्री. पंडित यांचे हातून अशाच प्रकारची काव्य-सेवा दीर्घकाल घडो अशी श्रीसाईचरणी प्रार्थना.

* * *

# साईभक्त म्हाळसापती भगत

[ लेखक– श्री. चंद्रकांत सामंत, प्रकाशक – श्री. कमलकांत सामंत, बी. ४ आशिर्वाद, २७२ स्वामी विवेकानंद रोड, वांद्रे; मुंबई ५०, किंमत २ रुपये ]

शिरडीचे संत श्रीसाईबाबा शिरडीस खंडोबाच्या देवळात आल्याबरोबर तेथील पुजारी श्रीम्हाळसापती यांनी ज्यांचे 'आवो साई' या शब्दात पुकार करून त्यांचे स्वागत केले व शेवटपर्यंत ते साईबाबांच्या बरोबर त्यांचे सेवक भक्त म्हणून राहिले त्या म्हाळसापतींचे छोटेखानी चरित्र श्रीसाईलीलेचे एक उत्साही व गुणी लेखक श्री. चंद्रकांत सामंत यांनी लिहिले असून ते खरोखरीच वाचनीय असे आहे. या पुस्तकात जुन्या शिरडीचे तसेच म्हाळसापतींची साईभक्तांना कुठेही वाचावयास मिळत नाही अशी माहिती मिळते. या पुस्तकाच्या कामी श्री. सामंत यांना म्हाळसापतींचे वयोवृद्ध चिरंजीव श्री. मार्तंड भगत, व साईभक्त डॉ. अण्णासाहेब गव्हाणकर त्यांनी विशेष माहिती पुरविली आहे. या मौलिक पुस्तकाला ठाण्याचे संत श्री. गजानन महाराज पट्टेकर यांनी प्रस्तावना लिहिली आहे. पुस्तकात प. पू. म्हाळसापतींच्या जीवन चरित्राचे अगदी सांगोपांग विवेचन करण्यात आले असून म्हाळसापतींचे घराण्यांचे पूर्व चरित्र, कौटुंबिक जीवन, विरक्ती, साईभक्ती, अपत्यसंपदा श्रीखंडोबाख्यान दृष्टांत, श्रीबाबांचे आगमन, गुरुस्थान इ. ची माहिती सात प्रकरणातून दिलेली आहे. प्रत्येक साईभक्ताने हे पुस्तक आपल्या संग्रही अवश्य ठेवावे अशी आमची शिफारस आहे.

— साईनंद